RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ११, अंक २७] शुक्रवार, डिसेंबर २६, २०२५/पौष ५, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३.**—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. .. | १-३ |


**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २६ डिसेंबर २०२५.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIII OF 2025.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९६५ चा महा. ४० **आणि ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी, आता**, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१अ-१अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ५१अ-१अ पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६५ चा महा. ४०.

"(३अ) (एक) जर कोणतीही व्यक्ती, अध्यक्ष म्हणून व परिषद सदस्य म्हणून निवडून आली तर, तिला, एकाच वेळी, दोन्ही पदे धारण करता येतील.

(दोन) एकाच वेळी अध्यक्षाचे व परिषद सदस्याचे पद धारण करणाऱ्या व्यक्तीस, एकतर, अध्यक्ष म्हणून किंवा परिषद सदस्य म्हणून केवळ एकच मत देता येईलः

परंतु, समसमान मते पडल्यास, अध्यक्षास निर्णायक मत देता येईल.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-१अ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-१अ मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३अ) (एक) जर कोणतीही व्यक्ती, अध्यक्ष म्हणून व पंचायत सदस्य म्हणून निवडून आली तर, तिला, एकाच वेळी, दोन्ही पदे धारण करता येतील.

(दोन) एकाच वेळी अध्यक्षाचे व पंचायत सदस्याचे पद धारण करणाऱ्या व्यक्तीस, एकतर, अध्यक्ष म्हणून किंवा पंचायत सदस्य म्हणून केवळ एकच मत देता येईलः

परंतु, समसमान मते पडल्यास, अध्यक्षास निर्णायक मत देता येईल.".

## निवेदन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याची कलमे ५१अ-१अ व ३४१ब-१अ यांमध्ये, अनुक्रमे, नगर परिषदांच्या व नगर पंचायतींच्या अध्यक्षांच्या थेट निवडणुकीची तरतूद केली आहे.

**२.** नगर परिषदेचे व नगर पंचायतींचे सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असणारी व्यक्ती, तिचा अध्यक्ष म्हणून निवडून येण्यास देखील पात्र असते. म्हणून, एखाद्या व्यक्तीस, एकाच वेळी अध्यक्ष म्हणून व सदस्य म्हणून देखील निवडणुका लढविता येतील आणि दोन्ही पदांवर देखील निवडून येता येईल. अशा दोन्ही पदांवर निवडून आलेल्या व्यक्तीस, दोन्ही पदांसाठी जनादेश मिळालेला असतो. अध्यक्ष म्हणून अप्रत्यक्षपणे निवडून आलेली व्यक्ती, सदस्य म्हणून देखील राहते आणि एकाच वेळी, अध्यक्ष व सदस्य म्हणून देखील काम करते.

म्हणून, थेट निवडून आलेल्या अध्यक्षास, सदस्य म्हणून राहणे देखील शक्य व्हावे असे शासनास इष्ट वाटते. म्हणून, थेट अध्यक्ष म्हणून व सदस्य म्हणून निवडून आलेल्या व्यक्तीस, एकाच वेळी, दोन्ही पदे धारण करता यावीत अशी स्पष्ट तरतूद करण्यासाठी उक्त अधिनियमाची कलमे ५१अ-१अ व ३४१ब-१अ यांमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे. अशा व्यक्तीस, एकतर अध्यक्ष म्हणून किंवा सदस्य म्हणून केवळ एकच मत देता येईल आणि समसमान मते पडल्यास, अध्यक्षास निर्णायक मत देता येईल अशी तरतूद करण्याचे देखील प्रस्तावित केले आहे.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई, **आचार्य देवव्रत,**

दिनांक २५ डिसेंबर २०२५. महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. के. एच. गोविंद राज,**

शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.